**शासन घोषित किमान आधारभुत किंमत (MSP) ही विहित कालावधीतील कृषि उत्पन्न बाजार समितीच्या आधारीत दरापेक्षा जास्त असल्यास त्यामधील फरकाची रक्कम बिजोत्पादक शेतकऱ्यांना देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि,पशुसंवर्धन,दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण २७२३/प्र.क्र.१६२/१-अे**
मंत्रालय विस्तार, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २९ डिसेंबर, २०२३.

वाचा:-

१. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र.:- संकीर्ण २७१७/ प्र.क्र.१९९/१अे, दि. १७.०९.२०१८.
२. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र.:-योजना ३३२२/प्र.क्र.१५८/१अे, दि.२५.१०.२०२३.
३. कृषि आयुक्तालयाचे पत्र जा. क्र. कृ. आ. गुनि/१/२/एमएसपी/३१०७२/२०२३. दिनांक २६.०९.२०२३.
४. राज्यस्तरीय समितीचे बैठकीचे इतिवृत्त योजना २७२३/प्र.क्र.१६२/१अे दि.२७.१०.२०२३.

प्रस्तावना:-

राज्यातील बिजोत्पादन कार्यक्रमात स्थिरता आणण्याच्या दृष्टीने तसेच, शेतकऱ्यांचा बिजोत्पादन कार्यक्रमातील सहभाग कायम राखण्याच्या दृष्टीने दिनांक १७ सप्टेंबर,२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार कृषि उत्पन्न बाजार समिती दर आणि शासन घोषित आधारभुत किंमत (MSP) यामधील फरकाची रक्कम बिजोत्पादक शेतकऱ्यांना देण्याबाबतची योजना सन २०१८-१९ पासून लागू करण्यात आलेली आहे.

२. राज्यातील बिजोत्पादन कार्यक्रमांतर्गत कृषि उत्पन्न बाजार समिती आधारीत दर व पीकनिहाय शासन घोषित किमान आधारभूत किंमत (MSP) यातील फरकाची रक्कम महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला व राष्ट्रीय बीज निगम, पुणे यांच्या मार्फत सन २०२२-२३ मध्ये बिजोत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांना अदा करणेसाठीच्या कृषि आयुक्तालयाच्या प्रस्तावास मान्यता देण्यासाठी राज्यस्तरीय समितीची बैठक मा. अपर मुख्य सचिव (कृषि) यांच्या अध्यक्षतेखाली दि.२७.१०.२०२३ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीत महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला व राष्ट्रीय बीज निगम, पुणे यांच्या कृषि आयुक्तालयामार्फत प्राप्त झालेल्या रु.१८२७.०३ लाख इतक्या रकमेच्या प्रस्तावास संदर्भ क्र.०४ अन्वये राज्यस्तरीय समितीने मान्यता दिलेली आहे.

३. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात सदर योजनेकरिता लेखाशिर्ष २४०१ ए९२२ अंतर्गत रु.२५.०० कोटी इतक्या रक्कमेची अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आलेली आहे. सदर योजनेकरिता वाचा क्र. ०२ येथील शासन निर्णयान्वये रु.४१२.१६७ लाख निधी सन २०२१-२२ मधील बिजोत्पादक शेतकऱ्यांकरिता वितरीत करण्यात आलेला असल्याने सद्यस्थितीत वितरणाकरिता रु.२०८७.८३ लाख इतकी तरतूद वितरणाकरिता शिल्लक आहे. कृषि आयुक्तालयाच्या रु.१८२७.०३ लाख इतक्या रकमेचा प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेकरिता सादर केलेला होता. वित्त विभागाने सदर योजनेकरिता रु.१३३८.०० लाख निधी वितरीत करण्यास मान्यता दिलेली आहे.

४. यानुषंगाने महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला व राष्ट्रीय बीज निगम यांचेमार्फत सन २०२२-२३ मध्ये बिजोत्पादन घेतलेल्या शेतकऱ्यांना कृषि उत्पन्न बाजार समिती आधारीत दर व शासन घोषित किमान आधारभूत किंमत (MSP) यामधील फरकाची रक्कम देणेसाठी रु. १३३८.०० लाख इतका निधी सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या उपलब्ध अर्थसंकल्पिय तरतूदीतून कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे यांना उपलब्ध अर्थसंकल्पिय तरतूदीतून वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

सन २०२२-२३ मध्ये महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला व राष्ट्रीय बीज निगम यांचेमार्फत बिजोत्पादन घेतलेल्या शेतकऱ्यांना कृषि उत्पन्न बाजार समिती आधारीत दर व शासन घोषित किमान आधारभूत किंमत (MSP) यामधील फरकाची रक्कम देणेसाठी **रु. १३३८.०० लाख इतका निधी सन २०२३-२४ या चालू वर्षीच्या लेखाशिर्ष २४०१ ए ९२२ (१०० % राज्य योजना) अंतर्गत उपलब्ध असलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून वितरीत करण्यात येत आहे.**

२. सदर योजनेतंर्गत सन २०२३-२४ मध्ये राज्यात राबविण्यासाठी होणारा खर्च पुढील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

मागणी क्रमांक डी-३-२४०१, पिक संवर्धन, १०३, बी-बियाणे,
(००)(२८) किमान आधारभुत किंमत (MSP) आणि कृषि उत्पन्न बाजार समिती आधारभूत दर यामधील फरकाची रक्कम बिजोत्पादक शेतकऱ्यांना देण्याबाबत, (१०० टक्के राज्य कार्यक्रम)
३३- अर्थसहाय्य, (२४०१ A९२२)

३. सदर योजना राबविताना खालील अटी व शर्तीचे पालन करण्यात यावे-

१. सदर निधी P.L.A./बँक खात्यांमध्ये ठेवला जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.
२. या प्रित्यर्थ होणारा खर्च हा सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता मंजूर केलेल्या अनुदानातून भागविण्यात येऊन उपरोक्त लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.
३. कृषि उत्पन्न बाजार समिती दर आणि शासन घोषित किमान आधारभूत किंमत (MSP) फरकाची रक्कम थेट लाभ हस्तांतरणाद्वारे बिजोत्पादक शेतकऱ्यांच्या आधारलिंक बँक खात्यामध्ये जमा करण्यात यावी.
४. वितरीत करण्यात आलेल्या निधीच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करावे.

४. सदर योजनेकरीता आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना योजनेचे नियंत्रण अधिकारी म्हणुन व सहायक संचालक, लेखा-१ यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणुन घोषित करण्यात येत आहे.

५. प्रस्तुतचा शासन निर्णय हा महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका (भाग-१) १९७७ मधील परिच्छेद १४२ व १४४ अन्वये प्रशासकिय विभागांना प्रदान केलेल्या शक्तीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत. तसेच, वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं -२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक १२.०४.२०२३ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक अनौसं-३४६/२०२३/व्यय-१, दि.०८.१२.२०२३ अन्वये देण्यात आलेल्या मान्यतेनुसार विभागाच्या स्तरावर निर्गमित करण्यात येत आहेत.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२३१२२९१२५७००५६०१ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

UMESH NARAYAN CHANDIWADE

Digitally signed by UMESH NARAYAN CHANDIWADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT,
2.5.4.20=0a3a08c7339c487fe2836238383bf91bbd037b93b4bdf6c8e95d1969e585fffe, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=CCBE80FCC6B64503B4E8B1269BD88D631F3F3C2BEF6E1CA70CC9A4E30954011F, cn=UMESH NARAYAN CHANDIWADE
Date: 2023.12.29 12:56:50 +05'30'

**(उमेश चांदिवडे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.अपर मुख्य सचिव (कृषि), यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित (महाबीज), अकोला.
५. व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय बीज निगम, गुलटेकडी, पुणे.
६. कृषि संचालक (निविष्ठा व गुण नियंत्रण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. महाव्यवस्थापक (उत्पादन), महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित (महाबीज), अकोला.
८. सर्व संचालक/सह संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. सर्व विभागीय कृषि सह संचालक.
१०.सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी.
११.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१२.महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
१३.अवर सचिव (व्यय-१), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१४.कक्ष अधिकारी (कार्य.१४३१), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१५.कक्ष अधिकारी (२-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
१६.निवडनस्ती, कार्यासन १अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई -४०००३२.